**मे. पुर्णा सहकारी साखर कारखाना, बाभुळगांव, ता. बसमतनगर, जिल्हा हिंगोली, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित विस्तारीकरण ३० किलो लिटर प्रतिदिन ते ६० किलो लिटर प्रतिदिन आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

.......................................................................................................................

मे. पुर्णा सहकारी साखर कारखाना, बाभुळगांव, ता. बसमतनगर, जिल्हा हिंगोली, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित विस्तारीकरण ३० किलो लिटर प्रतिदिन ते ६० किलो लिटर प्रतिदिन आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, हिंगोली यांचे अध्यक्षतेखाली दि. १५ एप्रिल २०२१ रोजी सकाळी १२-०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ३२ / २०२१ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २१०४०७ – एफटीएस – ०११९ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, हिंगोली | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, औरंगाबाद | : | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, परभणी | : | समन्वयक |

श्री. जयंत कदम, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २२.०२.२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी जिल्हयातील कोरोना व्हायरसचा प्रादूर्भाव लक्षात घेऊन सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी झुम ॲपद्वारे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी झुम ॲपद्वारे घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १४/०३/२०२१ रोजी दै. सकाळ (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या व कार्यकारी सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
- जिल्हा उदयोग केंद्र, हिंगोली
- जिल्हा परिषद, हिंगोली

- तहसिलदार, तहसिल कार्यालय, वसमत.
- मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, हिंगोली व वसमत.
- ग्रामपंचायत कार्यालय – बाभुळगांव
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ(मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी यांचेकडे दि. १२/०४/२०२१ रोजी मधुबाबु यांचा ईमेल आला आहे याव्यतिरिक्त कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास काही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, हिंगोली व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रस्तावित प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रतिनिधी व पर्यावरण सल्लागार व प्रयोगशाळा मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इजिनिअरींग सर्व्हिसेस लि.पुणे, यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व

परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

प्रकल्प प्रवर्तक प्रतिनिधी/तांत्रिक सल्लागार यांच्या सादरीकरणानंतर नागरीकांनी मांडलेल्या सुचना/आक्षेप इत्यादिंचा वृत्तांत खालील प्रमाणे:-

**प्रोसेडींग :**

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिचे नांव व पत्ता | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. आशुतोष पंडीतराव देशमुख.<br>रा. वसमतनगर<br>यांनी मुददा उपस्थित केला की, प्रस्तावित आसवनीमध्ये निर्माण होणा-या घन:कच-याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, राखेमध्ये उच्च प्रमाणात पोटॅश असल्यामुळे शेतीसाठी खत म्हणून वापरण्यात येईल. कोळश्याची राख वीट उत्पादकांना पाठविली जाईल. ईस्ट स्लज कंपोस्ट यार्डमध्ये प्रेस मड व स्पेंट वॉश बरोबर मिसळले जाईल. |
| २. | श्री. संजय श्रीरसागर.<br>रा. जवळा (कंदारबन)<br>यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्यातून निघणा-या सांडपाण्यापासून प्रदूषण कमी करण्यासाठी कोणत्या उपाय योजना करण्यात येतील? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, मल्टी इफेक्ट इव्हॅपोरेटर (एम.इ.इ.) व इन्सनरेशन बॉयलरमध्ये मध्ये स्पेंट वॉशची परिपूर्ण विल्हेवाट लावण्यात येईल.<br>कारखान्यामध्ये तयार होण्या-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अदयावत सयंत्रणा उभारण्यात येणार |

| | | |
|---|---|---|
| | | असल्यामुळे कारखान्यातून निर्माण होणारे सांडपाण्यावर झेडएलडी प्रक्रिया असेल. |
| ३. | श्री. दौलत कुंभार<br>रा. बाळापूर<br>यांनी मुददा उपस्थित केला की, नवीन प्रस्तावित डिस्टलरीमध्ये स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल काय? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, नवीन प्रस्तावित डिस्टलरीमध्ये साधारणत: ८० प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होतील त्यापैकी ३० ते ४० रोजगाराच्या संधी स्थानिक लोकांसाठी उपलब्ध होतील. |
| ४. | श्री. राम निवृत्ती झुंजूर्डे<br>रा. भोरीपगांव<br>यांनी मुददा उपस्थित केला की, सदर प्रकल्पामुळे परिसरातील शेतीवर काय परिणाम होईल ? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर प्रकल्पामुळे परिसरातील शेतीवर कोणताही परिणाम होणार नाही. |
| ५. | श्री. राजू नवघरे<br>रा. बाभुळगांव<br>यांनी मुददा उपस्थित केला की,<br>दुषित पाण्याची काय व्यवस्था करणार आहात? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, कारखान्यात निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अदयावत झेडएलडी सयंत्रणा उभारण्यात येईल.<br>मल्टी इफेक्ट इव्हॅपोरेटर (एम.इ.इ.) व इन्सनरेशन बॉयलरमध्ये मध्ये स्पेंट वॉशची परिपूर्ण विल्हेवाट लावण्यात येईल. |
| ६. | श्री. अविनाश उत्तमराव गावारे<br>रा. पिंपळा (चौरे)<br>यांनी मददा उपस्थित केला की, सदर प्रकल्प शेतक-यांसाठी कोणत्या योजना राबविणार आहे ?<br><br>कारखान्यास लागणारे पाणी कोठून उपलब्ध केले जाईल? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, कारखान्याद्वारे माफक दरात बगॅस व स्पेंटवॉशची राख खत म्हणून शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. आर्थीक तरतूदीप्रमाणे वृक्षारोपन व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील.<br><br>कालव्यामधून पाणी उपलब्ध करुन घेण्यात येईल व त्या बाबतची परवानगी घेतली |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. कारखान्यामध्ये तयार होणारे सांडपाणी रिसायकल करण्यात येईल. त्यामुळे ६० टक्के पाणी पुर्नवापरासाठी उपलब्ध होणार असल्यामुळे फारच कमी पाण्याची आवश्यकता लागणार आहे. |
| ७. | श्री. विलास शंकर पडोळे<br>रा. मांडी<br>यांनी मुददा उपस्थित केला की, डिस्टलरी प्रकल्प वर्षभर चालू राहिला पाहिजे.<br>आजूबाजूच्या लोकांना सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे कांही आजार होऊ शकतात काय याबाबत विचारणा केली. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर डिस्टलरी प्रकल्प वर्षभरात ३३० दिवस चालविण्याचे प्रस्तावित आहे.<br><br>उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, याबाबचा उल्लेख इआयएमध्ये केला आहे. |
| ८. | लोकसुनावणी समितीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ औरंगाबाद यांनी पर्यावरण संवर्धनासाठी कांही सुचना दिल्या जशा की,-<br>ईआयअे अहवालातील त्रुटी, इआयअेमध्ये व्हेनचुरी स्क्रबर चा उल्लेख केला आहे तर प्रेझेंटेशनमध्ये इएसपीचा उल्लेख करण्यात आला हे कान्ट्रॅडिक्टरी आहे. संमतीपत्राची प्रत जोडण्यात आलेली नाही. परवानगी घेऊ असे प्रेझेंटेशनच्या वेळी सांगण्यात आले. इन्सीनेरेशनरमुळे कोणत्या गांवांवर परिणाम होऊ शकतो इत्यादी<br><br>फायनल इआयअेमध्ये सर्व परवानग्या लावण्यात याव्यात. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, इम्पॅक्ट झोनमध्ये कोणतेही गांव येत नाही. तसेच प्रादेशिक अधिकारी तथा सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांच्या सुचनांचे अंतिम आघात मुल्यांकन अवहालामध्ये पुर्तता करण्याचे आश्वासित करण्यात आले. |

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, हिंगोली यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. तथापि, कोणीही पुढे आले नाही. तदनंतर सदर सुनावणीचे समन्वयक यांनी सदर सुनावणीचा सारांश विषद केला व संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, हिंगोली यांचे परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**( जयंत कदम )**
समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी

प्र० मं० जोशी

**( डॉ.प्र.म.जोशी )**
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

**( चंद्रकांत वि. सुर्यवंशी )**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, हिंगोली